प्रेस नोट ता. १६/१०/२०१७

## ओव्हरटेकच्या कारणावरुन हॉटेल मालकाचा खुन करणारे पाच आरोपी गजाआड

सातारा वडुज येथील हॉटेल मालक अभयसिंह गोडसे यांच्या व्हॅगनार गाडीचा कात्रज नवीन बोगद्याजवळ स्वीफ्ट गाडीला कट लागला या कारणावरुन स्वीफ्ट गाडीतील ५ तरुणांनी व्हॅगनार गाडी चालकास व त्याच्या मित्रास बेदम मारहाण करुन अभयसिंह गोडसे याचा खुन केला आहे. अनोळखी स्वीफ्ट गाडीतील ५ तरुणास पोलीसांनी गोपनीय बातमीदाराकडुन माहीती काढुन कौशल्याने निष्पन्न करुन इसम नामे १) राहुल उर्फ मनोज बाळासाहेब मते २) समीर रमेश पोकळे ३) गणेश अंकुश रायकर ४) राजेश आत्माराम पोकळे ५) नितीन ज्ञानोबा पोकळे सर्व रा. धायरी गाव पुणे यांना दि. १४/१०/२०१७ रोजी अटक करण्यात आलेली असुन कोर्टाने त्यांचा दि. १९/१०/२०१७ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केलेला आहे. याबाबत अधिक माहीती अशी की,

वडुज जि सातारा येथील हॉटेल मालक अभयसिंह गोडसे यांना चायनिज आचारी पुण्यातुन घ्यावयाचा होता. त्या करीता ते त्यांचा मित्र नामे समिर आतार याचे सोबत स्वत:ची व्हॅगनार गाडी घेवुन दि ०६/१०/२०१७ रोजी पुण्याकडे निघाली होती. अभयसिंह गोडसे गाडी चालवत होते. कात्रज बोगद्याचे जवळ त्यांनी एका स्विफ्ट गाडीला कट मारला या कारणावरुन स्विफ्ट गाडीने त्याचा पाठलाग सुरु केला व त्यांना वडगाव पुलावर अडवुन स्विफ्ट गाडीतील पाच तरुणांनी काठी, रॉड तसेच लाथा बुक्यांनी दोघांना बेदम मारहाण केली व त्यांनतर त्यांचे गाडीची हवा सोडुन ते निघुन गेले. अभयसिंह गोडसे जबर जखमी अवस्थेत चांदणी चौकात पोहचले व तेथेन नातेवाईकांना संपर्क साधुन ते वडुज सातारा येथे गेले मात्र प्रवासातच ते मरण पावले बाबत वडुज ग्रामीण रुग्नालय यांनी पोस्टमार्टेम अंती वडुज पोलीस स्टेशन जि सातारा यांनी ००/२०१७ नंबरने अकस्मात मयताची नोंद करुन मयत पुढील तपासकामी सिंहगड रोड पोलीस ठाण्याकडे वर्ग केले. अकस्मात मयताचे कागदपत्राचे अवलोकन केले असता खुनासारखा गंभीर गुन्हा निष्पन्न होत असल्याचे निदर्शनास आल्याने तात्काळ गु.र.नं. ३३३/१७ भा.द.वि.कलम ३०२, ३४१, ३२३, ३२४, ४२७, ५०४, १४३, १४४, १४७, १४८, १४९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचे तपासामध्ये आरोपी बाबत काही एक माहिती नसतांना, हाती कोणताही धागादोरा नसतांना सिंहगड रोड पोलीसांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत कौशल्याने तपास करून बातमीदारांचे मार्फत चार तासात गुन्हा उघडकीस आणुन आरोपींना ताब्यात घेतले. आरोपीतांना मयताचे व्हॅगनार गाडी क्रं. एमएच ११ बी.व्ही. १६०० हिने कात्रज नविन बोगदा या ठिकणी रॉगसाईड ओव्हरटेक करून कट मारल्याने आरोपीनी त्यांचा पाठलाग करून त्यांना आडवून मारहाण केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

मा अपर पोलीस आयुक्त, द.प्रा.वि. पुणे शहर रविंद्र सेनगावकर, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, डॉ प्रविण मुंढे, सहा पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग, डॉ शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विष्णु जगताप, पोलीस निरीक्षक (गुन्हे), बबन खोडदे,सपोनि जगताप, पोलीस उप निरीक्षक- रत्नदिप गायकवाड, पोलीस नाईक -संतोष सावंत, किरण देशमुख, प्रशांत काकडे, संग्राम शिनगारे, पोशि संदिप पवार, गुन्ला, दगडे यांनी आरोपींच्या जेरबंद केले आहे.गुन्ह्याचा अधिक तपास विष्णु जगताप,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,सिंहगड रोड करीत आहेत.